**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम योजना नुतनीकरण निधीमधून (ARF) घ्यावयाच्या कामांबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्रमांक ग्रापाधो-११११/प्र.क्र.५०/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : ३० एप्रिल, २०१२

वाचा : १) शासन परिपत्रक क्र.देप्रोअ-१३०८/प्र.क्र.८९/ प्रापु-०७, दि.३० जुलै,२००८
२) शासन परिपत्रक क्र.ग्रापाधो-११११/प्र.क्र.१३१/पापु-०७, दि.२१ सप्टेंबर,२०११

**प्रस्तावना :**

संदर्भ क्र. १ येथील शासन परिपत्रकान्वये, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्ती व पुनर्वसनासाठी योजना नुतनीकरण निधीतून घ्यावयाच्या कामांसंदर्भात मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तर, संदर्भीय क्र.२ येथील परिपत्रकान्वये निधी वितरणाची कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली आहे. या परिपत्रकामधील सर्व अटी व शर्तींची पुर्तता करता येत नसल्याने, ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी हा योजना नुतनीकरण निधी उपलब्ध करुन देता येत नाही. त्यामुळे यामध्ये सुधारणा करण्यात यावी, अशी विनंती अनेक जिल्हा परिषदांकडून शासनाकडे प्राप्त झालेली आहे. अशा परिस्थितीमुळे सध्या अनेक जिल्हा परिषदांकडे योजना नुतनीकरण निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर निधी शिल्लक राहत असल्याचे देखील शासनाच्या निदर्शनास आले होते.

वरील बाब विचारात घेऊन, मोठया दुरुस्ती वा उंपागे बदलण्याची गरज असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी योजना नुतनीकरण निधीतून (ARF) घ्यावयाची कामे तसेच त्यासंदर्भातील अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:**

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, संदर्भ क्र.१ व २ येथील शासन परिपत्रक अधिक्रमित करून, जिल्हा परिषदांकडे शिल्लक असलेल्या योजना नुतनीकरण निधीतून (ARF) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती व नुतनीकरणाची कामे घेण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-

**१. योजना नुतनीकरण निधीतून घ्यावयाची अनुज्ञेय कामे :**

तांत्रिक बिघाडामुळे गेल्या एक वर्ष व त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी बंद असलेल्या योजना, किंवा योजना चालू आहे, मात्र मोठ्या दुरुस्ती व नुतनीकरणाची आवश्यकता आहे अशा योजनांची खालील कामे घेता येतील.

- १५ वर्षापेक्षा जास्त जुन्या एसी (सिमेंट) पाईपलाईन्सच्या तुटफुटीमुळे योजना बंद आहे. परंतु पाईपलाईन बदलल्यास योजनेतून पाणी पुरवठा सुरळीत होऊ शकणार असल्यास अशी कामे घेता येतील.
- पाच वर्ष व त्यापेक्षा जास्त कालावधीच्या पंपींग मशिनरी नादुरुस्त अथवा उर्जा कार्यक्षमता कमी झाल्यामुळे योजना बंद असल्यास पंपींग मशिनरीची दुरुस्ती किंवा बदलण्याची कामे घेता येतील.
- वितरण व्यवस्था निकामी ठरल्याने पाणी पुरवठा बंद असलेल्या योजनांची (ज्यांची वितरण व्यवस्था १५ वर्षे व त्यापेक्षा जास्त जुनी झालेली आहे.) वितरण व्यवस्था दुरुस्ती किंवा बदलण्याची कामे घेता येतील.
- स्रोत निकामी ठरल्याने योजना बंद असल्यास, स्रोतांची मोठी दुरुस्ती अपेक्षित आहे व ती झाल्याने योजना कार्यान्वित होऊ शकेल, अशी कामे घेता येतील.
- साठवण व्यवस्था (ESR, GSR इत्यादी) निकामी ठरल्याने साठवण क्षमतेअभावी पाणी पुरवठा करता येणे शक्य नसल्यास, ही कामे घेता येतील.
- योजनेतील पाणी निर्जंतूकीकरणाची व्यवस्था (Disinfectant) निकामी झाली असल्यास अथवा कार्यक्षम नसल्यास पाणी निर्जंतूकीकरणासाठी क्लोरिनेशन / इलेक्ट्रो क्लोरिनेशन व्यवस्था स्थापित करता येईल.
- जुन्या पाणी पुरवठा योजनांचा उद्भव अपूरा ठरण्याची शक्यता विचारात घेऊन, गावातील अन्य उपलब्ध स्रोत अस्तित्वात योजनेशी जोडुन त्यांचा सामायिक वापर (Conjunctive use) करण्याचे दृष्टीने नियोजन करणे.

**२. कामांच्या मंजूरीसाठी मार्गदर्शक सुचना :**

पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्ती कामे योजना नुतनीकरण निधीतून पूर्ण करण्यासाठी, खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत-

१. योजनेची दुरुस्ती व पुनर्वसनाची कामे पूर्ण होईपर्यंत, योजनेतील सर्व सार्वजनिक नळखांबांचे घरगुती नळ जोडणी किंवा गट जोडणी मध्ये रुपांतर करण्यात याव्यात.

२. योजनेच्या दुरुस्ती व पुनर्वसनाची कामे पूर्ण करून योजना कार्यान्वित होण्यापुर्वी, ग्रामपंचायतीने योजनेच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्चाचे अंदाजपत्रक तयार करावे.त्यानुसार पाणी पट्टीच्या दरांचे पुर्नविलोकन करून, योजनेचा देखभाल व दुरुस्ती खर्च पाणी पट्टीच्या वसूलीतून भागेल, याप्रमाणे पाणी पट्टीची आकारणी व वसूली करावी.

## ३. योजना नुतनीकरण निधी (ARF) अंतर्गत योजनेच्या दुरूस्ती कामांचा प्राधान्यक्रम

१. तांत्रिक बिघाडामुळे गेल्या एक वर्ष व त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी बंद असलेल्या योजनांच्या दुरुस्ती प्रस्तावांना प्राधान्य देण्यात यावे.

२. पाणी पुरवठा योजनांची सध्याची वसूली अधिक आहे.

३. संबंधित गाव हे निर्मल ग्राम म्हणून घोषित झाले आहे.

## ४. प्रस्ताव सादर करण्याची व मंजूरीची कार्यपद्धती-

ग्रामपंचायतीनी परिच्छेद-१ मध्ये नमूद केलेली योजनेतील दुरुस्ती प्रस्ताव संबंधीत ग्रामपंचायतींनी जिल्हास्तरावरील जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीस सादर करावेत. जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने ग्रामपंचायतीच्या प्रस्तावांना सहमती देतांना परिच्छेद क्र.२ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार ग्रामपंचायतींकडून आवश्यक ते ठराव प्राप्त करुन घ्यावेत. त्यानंतर जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने विहित कार्यपद्धतीचा वापर करून या प्रस्तावांना सहमती द्यावी. समितीने या योजनांच्या प्रस्तावित दुरुस्ती काम केल्याने त्या प्रत्यक्ष कार्यान्वित होणार आहेत, किंवा कसे, तसेच, सदर प्रस्ताव तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण आहेत, याबाबतची सविस्तर छाननी करावी. सदर कार्यवाही त्वरीत होईल याप्रमाणे नियोजन करावे. प्रस्तावात काही त्रुटी संबंधित ग्रामपंचायतीस कळवून पुर्तता करण्यात यावी.

## ५. अनुज्ञेय अनुदान व वितरण-

पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावित नुतनीकरण कामांना मागणी आधारित समूह सहभागाचे धोरण लागू असेल.त्यासाठी लोकवर्गणी व जिल्हा स्तरावरील योजना नुतनीकरण निधीतून (ARF) उपलब्ध करून द्यावयाची रक्कम यांचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील-

| अ.क्र. | निकष | प्रस्तावाच्या एकुण खर्चावर आकारावयाची लोकवर्गणी | जिल्हा स्तरावरील योजना नुतनीकरण निधीतुन (ARF) उपलब्ध करून द्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | गाव १०० टक्के हागणदारी मुक्त नसल्यास तसेच पाणी पट्टीची वसूली पा.पु.योजनेच्या देखभाल-दुरुस्ती खर्चापेक्षा अधिक नसल्यास | १० टक्के | ९० टक्के |
| २. | गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असल्यास किंवा पाणी पट्टीची वसूली पा.पु.योजनेच्या देखभाल-दुरुस्ती खर्चापेक्षा अधिक असल्यास (यापैकी एक) | ५ टक्के | ९५ टक्के |
| ३. | गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असल्यास तसेच पाणी पट्टीची वसूली पा.पु.योजनेच्या देखभाल-दुरुस्ती खर्चापेक्षा अधिक असल्यास | निरंक | १०० टक्के |

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्तीच्या कामांना जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने सहमती दिल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतीने लोकसहभागापैकी, ५ टक्के रक्कम (पहिल्या निकषानुसार) किंवा २.५ टक्के रक्कम (दुस-या निकषानुसार) तात्काळ ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यामध्ये जमा करावी. त्यानंतर, पहिला हप्ता म्हणून दुरुस्ती खर्चाच्या ४५ टक्के अनुदानाची रक्कम जिल्हा परिषदेने समितीच्या खात्यामध्ये वर्ग करावी. ग्रामपंचायतीने उर्वरित ५ टक्के किंवा २.५ टक्के लोकसहभाग समितीच्या खात्यावर वर्ग केल्यावर तसेच पहिल्या हप्त्याचा निधी ७० टक्के खर्च झाल्यावर उर्वरित ४५ टक्के अनुदान जिल्हा परिषदेने तातडीने समितीला वर्ग करावे. जिल्हा परिषदांनी योजना नुतनीकरण निधीचे (ARF) स्वतंत्र लेखे ठेवावेत.

६. कामे पुर्ण करण्याचा कालावधी-

संबंधित ग्रामपंचायतीने योजनेच्या प्रस्तावित दुरुस्ती व पुनरुज्जीवनाचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून कामाच्या स्वरूपानुसार जास्तीतजास्त ३ ते ६ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावे. विशिष्ट परिस्थितीत यापेक्षा जास्त कालावधी लागणार असेल, तर तसा उल्लेख प्रस्तावात करावा.

७. संनियंत्रण व समन्वय-

योजना नुतनीकरण निधीमधून घेण्यात येणा-या कामाच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचे सनियंत्रण पाणी पुरवठा व स्वच्छता सहाय्य संस्थे (WSSO)मार्फत करण्यात येईल.पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने दरमहा योजना नुतनीकरण निधीमधून घेण्यात आलेल्या कामांच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचा अहवाल शासनास सादर करावा.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१२०४२००६०००३४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शैला ए.)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
३) मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४) मा.विधीमंडळ सदस्य (सर्व)
५) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, ग्राम विकास व पंचायत राज, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) संचालक, पाणी स्वच्छता व सहाय्य संस्था (WSSO), नवी मुंबई
११) सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१२) सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
१४) सर्व अधिक्षक अभियंता (ग्रामीण व नागरी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१५) अधिक्षक अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई
१६) सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
१७) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१८) महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)